[19]
डॉ. रेखा वडिखाये
नागपूर

# ग.त्र्यं. माडखोलकरांची 'अनघा '

अनघा ही ग.त्र्यं माडखोलकर यांची १९५०मध्ये प्रकाशति झालेली कादंबरी असून या कादंबरीत अभय पंडति ,अनघा,नरिुपमा देशपांडे ,नचकिेत ,भास्कर गुप्ते ,प्रल्हाद,रुस्तुम, गुलाबबाई,कर्नल भार्गव इत्यादी व्यक्तरेखा कादंबरीभर वावरताना दसितात. अनघा ही या कादम्बरीची नायकिा आहे. ग. त्र्यं. माडखोलकरांची 'अनघा' ही कादंबरी स्त्रीजीवनप्रधान आहे.सातारचे अग्रगण्य वकील रा.ब.दादासाहेब आगटे यांची अनघा एकुलती एक कन्या .दादासाहेब आण उमाबाई यांना एकामागून एक पाच मुलगे झाले खरे पण ते रांगते होण्याच्या आधीच मृत्युमुखी पडल्यामुळे त्यांच्या कुटुंबावर दु:खाचे ढग डवरले.सहाव्या खेपेला एक गोंडस मुलगी जन्माला आली तीच अनघा.उमाबाई म्हणत “हचिा पहलिा मुलगा आम्ही मांडीवर घेऊ तोच वंशवेल वाढवील आमचा?” (अनघा-पृ.१३)अनघा आगटे संस्कृत पंडतिा होती तसेच पुण्याची टेनसि चँपअिन होती तर अभय पंडति हे रसायन आण अर्थशात्र या वषियांचे प्राध्यापक होते. टेनसिचे पटाईत खेळाडू होते .ते प्रथम रसायन घेऊन केम्ब्रजि वद्यापीठाचे डी.एससी झाले आण नंतर अर्थशात्र घेऊन लंडन वद्यापीठाचे एम.ए.झाले.ती ज्या कॉलेजमध्ये शकित होती तेथे ते प्राध्यापक होते प्राचार्यांनी त्यांचा सामना ठेवला आण त्यात ओळख आण प्रेम व त्याचे लग्नात रुपांतर झाले.लग्नानंतरच्या काही वर्षातच तचिी प्रकृती खालावली.त्याचे कारण म्हणजे तचिा दोनदा गर्भपात करावा लागला.आजारपण आण आपल्याला मूल नाही याचे दु:ख या दोन गोष्टीमुळे तच्यिा प्रकृती आण प्रवृत्तीत बदल जाणवू लागला.अभय महावद्यालयातील गरीब,होतकरू वद्यार्थ्यांना मदत कारायचा.त्यातही काही दविसांतच त्याने,अमरावतीच्या हायस्कुलातून प्रवेश परीक्षेत केमेस्ट्री मध्ये प्रावण्यि मळिवून पहल्यिा वर्गात आलेल्या नचकिेत देशमुख

नावाच्या गरीब होतकरू वद्यािर्थ्याला आपल्या घरी ठेवून त्याची संपूर्ण जबाबदारी स्वत:वर घेतली.

कालांतराने अनघाला अस्थक्षिय झाल्याचे नदिान झाल्यावर हवापालटासाठी अभयने तलिा पचमढीला नेले.तेथील सुंदर नसिर्गात लेखक वाचकाला अनघाबरोबर त्याच्या नकळत पचमढीच्या संपूर्ण सुंदर परसिरात फरिवतात.अनघाला मूल झाले नाही म्हणून तच्यिा आईने आणि तच्यिा सासूने तच्यिाशी अबोला धरला.पण अभयचे तच्यिावरचे प्रेम मात्र तळिमात्र कमी झाले नाही.तो तलिा म्हणतो,"मला दु:खात गेलेल्या दविसातसुद्धा सुखाच्या शलाका दसितात,अनू.कारण सुखदु:खाच्या सर्व अवस्थांतून पार पडल्याशविाय जीवनाला गाढता,माधुरी आणि उदात्तता येत नाही,असं वाटतं मला. आपल्यावर जे दु:खाचे अनेक प्रसंग आले,त्यामुळेच खरोखरी एकमेकांच्या हृदयाची ओळख आपल्याला पटून,आपल्यात तादात्म्य उत्पन्न झालं.ते तादात्म्य हा जीवनाचा गाभा आहे आपल्या. " (अनघा-पृ.१६० ) दोघांचंही एकमेकांवर असलेलं जीवापाड प्रेम पाहून आणि वाचून वाचकाला गहवरिून येते आणि वाटते की असं प्रेम वास्तवात असू शकतं काय?की प्रेमाचा आदर्श लेखकाने वाचकापुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे?शेवटी पचमढीवरून परत येताना अभयच्या मांडीवर अनू आपला देह ठेवते. अभय आणि अनूच्या प्रेमाबरोबरच माडखोलकरांनी कादंबरीत इतरही वषियांची चर्चा केली आहे.

सातारच्या शुद्ध डोंगराळ हवेत वाढलेल्या आणि पुण्याच्या नागर सुसंस्कृत वातावरणात शकिलेल्या अनघाला नागपूर शहरातील वातावरणात करमेना तेव्हा अभयने नदिान धंतोली सारख्या परसिरात तरी बंगला घ्यावा अशी इच्छा ती व्यक्त करते तेव्हा माडखोलकर अभयच्या शब्दात नागपूर नागरीचे वैभव सांगतात ते असे, "आहे काय त्या धंतोलीत?बुदबळाच्या पटातल्या घरासारखे जागा मोजून न् आखून बांधलेले नर्जिीव बंगले! इथं शहराच्या एका टोकाला राहूनही लोकजीवनाचे जे नरिनिराळे थर आणि प्रकार पाहण्याची संधी आपल्याला मळिेल ती मजा काही धनतोलीच्या त्या कृत्रमि कारकुनी राहणीच्या हशिोबात दृष्टीस पडायची नाही कधी! आमचं हे नागपूर काही तुमच्या पुण्या –मुंबईसारखं पांढरपेशा कविा औद्योगकि शहर नाही.या शहरात एम्प्रेस मल्सि सारख्या बड्या गरिणीपासून एका मैलाच्या आतच हातमागावर कापड वणिणाऱ्या कोष्ट्यांची घरं आढळतील.न् राजकुलीन मराठ्यांच्या पडदानशीन महलिांप्रमाणेच कंचुकी न घालता समाजात नर्भियतेने वावरणाऱ्या जंगली कोसलकामनिीही पहायला मळितील.नागपूरच्या जनतेत ब्राह्मण,प्रभू,मराठा,कुणबी,तेली,कलार,कोष्टी ,गोंड वगैरे नरिनिराळ्या सुसंस्कृत आणि असंस्कृत जातीची जी सरमसिळ झालेली आहे तच्यिामुळे या शहराच्या जीवनाला एकप्रकारचं रंगेल आणि रंगेल वैचत्र्यि आलेलं असून हदिुस्तानातील नागर,कृषकि,औद्योगकि आणि वन्य अशा साऱ्या संस्कृतीची ववििधिता त्यात बघायला सापडते.ज्याला आपल्या वरिाट समाजाच्या अंगोपांगाचं नरीक्षण कविा चत्रिण करायचं असेल त्याला नागपूर सारखं दुसरं ठकिाण महाराष्ट्रात मळिणार नाही. कारण हदिुस्तानातल्या बहुतेक सगळ्या

संस्कृतीचा,धर्माचा आणि जातीचा संगम आणि संकर या मध्यवर्ती शहरात झालेला आहे." (अनघा-पृ.३६) वरील परिच्छेदातून माडखोलकरांनी नागपूरच्या समाजाचे हुबेहूब दर्शन घडविले आहे. तसेच गांधीवाद आणि मार्क्सवादावरही कादंबरीत बरीच चर्चा घडवून आणली आहे.

अभयच्या कालेजमध्ये गांधीवाद व मार्क्सवाद यांच्यावर तज्ज्ञांचा वादविवाद घडवून आणला होता त्यात बोलताना अभय म्हणतो,"हिंदुस्तानला विज्ञानपूर्व युगात नेणाऱ्या गांधीवादाच्या प्रतिगामी प्रयत्नाचे चरखा हे मूर्तिमंत प्रतीक आहे.जागतिक शक्तीच्या संघर्षामुळेच मुख्यत: हिंदुस्तानला फारसे प्रयास न पडता जे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे त्याची परिणिती समाजवादी लोकशाहीत होऊन स्वंयपूर्ण राष्ट्र निर्माण व्हावे आणि त्याने आशियातील परतंत्र देशांना पाश्चात्य साम्राज्यशाहीच्या पाशातून मुक्त करावे अशी जर आपली आकांक्षा असेल,तर गांधीवादाचा त्याग करून आपल्याला मार्क्सवादातील मुख्य तत्वांचा अंगीकार करावा लागेल,याबद्दल मला यत्किंचितिही शंका नाही."(अनघा पृ.क्र.६२)यावरून अभय मार्क्सवादी विचारांचा असल्याचे जाणवते.

कादंबरीतील निरुपमा २५ वर्षे वयाची आहे.ती मराठी रंगभूमी या विषयावर पीएच.डी.करीत आहे.तिचे एका तरुणावर प्रेम होते.त्याचेही तिच्यावर होते पण त्याच्या आईवडिलांच्या नकाराला तो विरोध करू शकला नाही त्यामुळे ते विवाहबद्ध होऊ शकले नाहीत.त्याचे नाव अनिल मेहता. आणि त्यानंतर जेव्हा अनघा लग्नाचा विचार तिच्यापुढे ठेवते तेव्हा ती म्हणते, "मला मुळी सूनच होण्याची इच्छा नाही कुणाची.मी फक्त पत्नी व्हायला तयार आहे.त्या व्यतिरिक्त दुसरे कोणतेही नाते नको आहे मला.संयुक्त कुटुंबात सून म्हणून राहायचं म्हणजे स्वत:च्या सगळ्या आवडी-निवडी, आशा-आकांक्षा, वासना-कामना चिरडून, मारून टाकून, त्या कुटुंबाची जी काय एक परंपरा चालत आलेली असेल, त्या परंपरेशी समरस होऊन राहूयचं!थोडक्यात, स्वत:चे अस्तित्व, व्यक्तीत्व, अस्मिता स्वत:च्या हातांनी मारून टाकायची कुटुंबाच्या व्यापक कल्याणासाठी.मला संसार हवा तो माझा हवा.त्या संसारात तिसरं कुणीही नको मला.स्त्री जशी पुरुषासाठी आपले कुटुंब सोडते तसं पुरुषानंही सोडलं पाहिजे स्त्रीसाठी आपलं सगळं कुटुंब!जो पुरुष माझ्यासाठी स्वत:चं सगळं कुटुंब सोडायला तयार होईल,त्याच्याशीच लग्न करीन मी.माझं घर हे त्याच्या गोतावळ्याची धर्मशाळा नाही होता कामा ! "(अनघा पृ.१००-१०१) या कादंबरीत माडखोलकरांनी निरुपमाच्या शब्दात जणू २१व्या शतकातील समाजवास्तव चितारलेले दिसते.आज त्यांनी सांगितलेली बाब कुटुंबात आणि समाजात प्रकर्षाने जाणवते. आजच्या समाजजीवनाचे भाकीत त्यांनी साधारणपणे ७० वर्षापूर्वी करावे  हे त्यांचे केवढे द्रष्टेपण होय.शेवटी निरुपमा कर्नल भार्गव यांच्याशी विवाहबद्ध होते.

कादंबरीत पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धापूर्वीचा काळ व नंतरचा काळ यासंबधीची सविस्तर चर्चा करीत माडखोलकरानी अभयच्या माध्यमातून,वर्तमानकालीन पार्श्वभूमीवर उपयुक्त ठरणारा, नवे संदर्भ असणारा कर्मयोग

सांगतिला आहे.तो खरोखरीच वाचकाला वचिारप्रवृत्त करणारा आहे.यासंदर्भात सांगताना अभय म्हणतो,"जीवन आणि संसार यांच्यावषियीच्या सगळ्या जुन्या कल्पना या अणुयुगात आपल्याला टाकून दलि्या पाहजित. तीन पढि्यांचा कवि सात पढि्यांचा जो वचिार करायचा तो सर्व समाजासाठी केला पाहजि.अनासक्ती हा अणुयुगाचा धर्म झाला पाहजि.त्या धर्माचं आचरण करणारे नषि्काम कर्मयोगीच जगाची प्रगती करू शकतील.जग हे नश्वर आहे,माया आहे हे आपल्या वेदांत्यांनी जे सांगतिलं त्यापेक्षा अगदी नरिाळ्या वैज्ञानकि अर्थाने ते तसं आहे हे ओळखून आपण जगावषियी वचिार केला पाहजि आणि त्यापरमाणे जीवनाची घडण बनवलिी पाहजि. " (अनघा पृ.९३) आजच्या अणुयुगात जीवन अतशिय गतमिान झाल्यामुळे कशाचीही शाश्वती उरलेली नाही.त्यामुळे अशाश्वत गोष्टींचा हव्यास करण्यात आणि भौतकि सुखाच्या मागे धावण्यात अर्थ नाही.सामाजकि बांधलिकी जपत व्यक्तीने समाजाभमिुख व्हायला हवे असा मोलाचा सल्ला ते देताना दसितात.

कादंबरीत,"संधप्रिकाश अद्याप पुरता लोपला नव्हता.पश्चमि क्षतिजिावर तृतीयेची चंद्रकोर गुरगुरणाऱ्या ढगांच्या रांगातून वाट काढीत होती.तचिे सौम्य गुलाबी तेज डोळ्यांना सुखवीत होते;तर क्षतिजिाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत मधून लखलखणारी वीज आपल्या तेजस्तांडवाने डोळे दपिवीत होती.एकमेकांना बलिगून मालाकार उडत असलेल्या बगळ्यांच्या पांढ शुभ्र पंक्ती त्या संमशि्र प्रकाशात वर्षर्तुतील संगमोत्कंठेचे स्मरण देत होत्या;तर झाडीतील काजव्यांचा चमचमाट आपल्या मोहक लकाकीने ती स्मृती उद्दीपीत करीत होता.कालव्याच्या झुळझुळत्या कलरवाला लाभलेली बेडकांच्या तारस्वरांची साथ वर्षर्तुतील घनगंभीर वृंदवादनातील वैचत्रि्य प्रकट करीत होती.आंब्याच्या झाडावर एकटाच बसलेला कोकीळ मध्येच ज्यावेळी मुक्तकंठाने आक्रंदे ,त्यावेळी त्याच्या त्या चढत्या,भेदक प्रणयार्त सुरांनी ते ववििधि गंधांनी भारावलेले आर्द्र वातावरण कंपति होऊन जात असे."(अनघा –पृ.२६,२७ ) अशी सुंदर नसिर्ग वर्णने आहेत, त्यामुळे कादंबरी वाचकाच्या मनाचा ठाव घेते.

नागपूरातील धंतोली,मॉडेल मलिचा परसिर ,अजनी अशा ववििधि ठकिाणांची वर्णने वाचकाला नागपूर नगरीचे दर्शन घडवतिात.उदा."मॉडेल मलि्स रोडवरील त्यांचा बंगला,शेजारी पारशी कुटुंबाची सुसंस्कृत वसती,भोंग्याचा आवाज,गरिणीकडे धावत-पळत येणाऱ्या कामगार स्त्री-पुरुषांची मोठ्याने चाललेली अर्वाच्य बोलणी ,हवेत असणारे कोळशाचे कण,कापसाचे धागे इत्यादी."(अनघा –पृ.३४,३५) कादंबरीतील व्यक्तरिखा, त्यांचे संवाद, घटना, प्रसंग, नसिर्गचत्रिण इत्यादींच्या सुरेख मांडणीमुळे कादंबरीला एक वशिषि्ट आकृतबिंध प्राप्त झाला आहे.नाट्यात्मकता आणि चत्रिमयता या गुणांमुळे वाचकाला ती खळिवून ठेवते.

एकूणच 'अनघा' ही माडखोलकरांची कादंबरी स्त्रीजीवनाचा वेध घेणारी असली तरी १९५०च्या आसपासच्या राजकीय,सामाजकि परस्थितीचे चत्रि दृष्टीपुढे उभे करून त्यावर चर्चा व चतिन करायला भाग पडणारी ही कादंबरी आहे. मार्क्सवाद, गांधीवाद, कुटुंबसंस्था, ववािहसंस्था, संततीवषियक वचिार, तत्कालीन